19

दिनांक १९/०५/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**आलोसे क्रं. 1) श्रीमती सुनिता मिसाळ, पद-पोलीस निरीक्षक, पो.स्टे. दौलताबाद औरंगाबाद शहर, 2) रनजित सहदेव सिरसाठ, पद-पो.ना. ब.नं. 361 पो.स्टे. दौलताबाद औरंगाबाद शहर, आलोसे क्रं. 02 यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.12,000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे दौलताबाद,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | 1) श्रीमती सुनिता मिसाळ, पद-पोलीस निरीक्षक, पो.स्टे. दौलताबाद औरंगाबाद शहर,<br>2) रनजित सहदेव सिरसाठ, पद-पो.ना. ब.नं. 361 पो.स्टे. दौलताबाद औरंगाबाद शहर |
| लाच मागणी रक्कम | :- | 25,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 12,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदाराचे यांचे पो.स्टे. दौलताबाद हद्दीमध्ये अवैध गुटखा विक्री व वाहतुक करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे पो.स्टे. दौलताबाद हद्दीमध्ये अवैध गुटखा विक्री व वाहतुक करण्यासाठी दरमहा एक केस व मासिक हप्ता म्हणुन तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दि.24 /3/2022 रोजी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आलोसे क्रं. 01) श्री. सुनिता मिसाळ, पोलीस निरीक्षक, दौलताबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे पो.स्टे. दौलताबाद हद्दीमध्ये अवैध गुटखा विक्री व वाहतुक करण्यासाठी दरमहा एक केस व मासिक हप्ता म्हणुन 25,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. व आलोसे क्रं.02) श्री. रनजित सिरसाठ यांनी स्वत:साठी मासिक हप्ता म्हणुन 2000/- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि.19/05/22 रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे क्रं. 02) श्री. रनजित सहदेव सिरसाठ, पद-पो.ना.ब.नं.361 पो.स्टे. दौलताबाद औरंगाबाद शहर यांनी पंच साक्षीदारासमक्ष तडजोडी अंती ठरलेली लाचेची रक्कम आलोसे क्रं. 01) यांचे करिता लाचेची रक्कम रुपये 10,000/- व स्वत: करिता रुपये 2000/- असे लाचेची रक्कम एकुण रुपये 12,000/- पो.स्टे.दौलताबाद औरंगाबाद शहर येथे स्विकारल्यानंतर आलोसे क्रं. 02 यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. दौलताबाद औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं/राजेंद्र जोशी, विलास चव्हाण, प्रकाश घुगरे चांगदेव बागुल, मपोअ/आशा कुंटे, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**